साहसिक
सजग समाजाचा दक्ष प्रहरी
मुख्य संपादक : रवींद्र एन. कोटंबकार
मो.नं. ९०९६९६८३४०
कार्यालय : ब्लॉक नं. ७४,७५रजत संकुल, रॉय उद्योग परिसर, बसस्थानकच्या समोर, गणेशपेठ, नागपूर-१८
E-mail : dsahasikngp@gmail.com
श्री. अकिल अहमद उर्फ गुड्डुभाई
नागपूर विभाग संपादक
मो.नं. ९११२२७४११००

दैनिक साहसिक
epaper
www.sahsik.com
सजग समाजाचा दक्ष प्रहरी




वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, अमरावती, अकोला, बुलडाणा, वाशिम, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली, दिल्ली व मुंबई येथुन एकाचवेळी प्रकाशित ...!

वर्ष : १२ अंक : २५६ मंगळवार १६ एप्रिल २०१९ मुख्य संपादक : रवींद्र एन. कोटंबकार (पाटील) (पृष्ठ -८) मूल्य : ३ रुपये

### दिनविशेष

* भागवत एकादशी

### सुविचार

थोरांचे सद्गुन घेणे, हीच
त्यांना वाहिलेली खरी श्रद्धांजली!

### चारोळी

तुझे काय ते तुला माहीत
प्रेम माझे खरे होते
तुला ओळखता नाही आले
मी तर तुला सर्वस्व वाहिले

### हसा जरा जपून..

**मुलगी पाहण्याचा कार्यक्रम चालू होता मुलाने मुलीला प्रश्न विचारला :** इंग्लीश जमते का?

**मुलगी :** तुम्ही प्रेमाने पाजत असाल तर ''गावठी'' पण जमेल.

## आज अमरावतीत उद्धव ठाकरे यांची जाहीर सभा

*जिल्हा प्रतिनिधी / १५ एप्रिल*

**अमरावती :** शिवसेना - भाजपा, रिपाई (आ.) महायुतीचे उमेदवार आनंदराव अडसुळ यांच्या प्रचारार्थ शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांची आज शहरात महाविजयी संकल्प सभा आयोजीत करण्यात आली आहे. शहरातील नेहरु मैदानावर दुपारी २ वाजता ही सभा होणार आहे.

शिवसेना - भाजपा, रिपाई (आ.) महायुतीचे अमरावती लोकसभा मतदार संघाचे उमेदवार आनंदराव अडसुळ यांच्या प्रचारार्थ शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची महाविजयी संकल्प सभा आयोजीत आहे. शहरातील नेहरु मैदान येथे दुपारी २ वाजता ही सभा होणार आहे. आज सायं. ५ नंतर प्रचारतोफा बंद होणार असून अमरावती लोकसभा मतदार संघाची निवडणूक गुरुवार दि. १८ एप्रिल रोजी होणार असून शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे या महाविजयी संकल्प सभेत काय बोलणार याकडे येथील जनतेचे लक्ष लागले आहे.

# सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश रोहिंटन फली नरिमन व विनीत सरण यांच्याविरुद्ध तक्रारीची चौकशी व कारवाईसाठी वकिलांच्या आंदोलनाचे नेतृत्व करणार अण्णा हजारे




* सरन्यायाधीश रंजन गोगोईंना लिहणार पत्र
* इंडियन बार असोसिएशनच्या आंदोलनाचे नेतृत्व करण्याचा अण्णाचा पुनरुच्चार
* न्यायलयीन भ्रष्टाचार रोखून बेकायदेशीर आदेश पारित करणाऱ्या न्यायाधीशांविरुद्ध भा.दं.वि चे २१८, २१९ आदी कलमांतर्गत कारवाई करावीच लागेल अन्यथा देशभर आंदोलन करून लोकशाही व न्यायाचा खरा अर्थ न्यायालयालाच समजावून सांगण्याची वेळ आली आहे.




*विशेष प्रतिनिधी / १५ एप्रिल*

**राळेगण सिद्धी :** सर्वोच्च न्यायालयाचे न्या. रोहिंटन नरिमन व न्या. विनित सरण यांच्या विरोधात इंडियन बार असोसिएशनचे महाराष्ट्र व गोवाचे अध्यक्ष ॲड. विजय कुर्ले यांनी दिलेल्या तक्रारीवर कारवाईत विलंब होत असून तक्रारकर्ते व साक्षीदारांवर दबाब आणण्यासाठी आरोपी न्यायाधीश स्वत:च आदेश पारीत करून कोर्ट अवमाननाची नोटीस देतात. यावरुन इथे कायद्याचे राज्य आहे कि, त्या न्यायाधीशाचा कायदा हा घटनेपेक्षा मोठा झाला आहे? या अन्याया विरोधात सरन्यायाधीश रंजन गोगोई यांनी दोषी न्यायाधीशावर त्वरित कारवाई केली नाही. तर देशभर जेलभरो आंदोलन सुरू करण्यात येईल व त्याचे नेतृत्व मी करेन अशी घोषणा अण्णा हजारे यांनी १४ एप्रिलला राळेगणसिद्धि येथे केली.

याबाबत सविस्तर वृत्त असे कीं, कोर्ट अवमानना कायद्यांतर्गत कोणत्याही व्यक्ती विरुध्द कारवाई करण्याआधी त्याच्या विरुध्द आरोप, निश्चित करून त्याला त्याचा बचाव, करण्याची संधी देवून त्याचे म्हणणे ऐकून घेतल्याशिवाय त्याच्या विरुध्द तो दोषी आहे असे अनुमान काढता येणार नाही. नैसर्गिक न्यायतत्वाला धरून असा स्पष्ट कायदा असल्याने सर्वोच न्यायालयाने स्वत: तो कायदा डॉक्टर एल. पी. मिश्रा (१९९८) ७ SCC ३७९ प्रकरणात लागू केला आहे.

परंतु त्या कायद्याचे उल्लंघन करून स्वत:च्या वैयक्तिक द्वेषापोटी माझ्या वडिलांचे नाव (ॲड.फली नरिमन यांचे) का घेतले ? असे कारण पुढे करून कोणतीही प्रक्रिया न अवलंबता ॲड. मेथ्यु नेदुमपारा या वकिलांना दोषी

(उर्वरित पान २ वर)







